# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (स्थापना विभाग)

जाहिरात क्र. 366/ज.स./2021 दि. 22/12/2021

## थेट मुलाखत

नागपूर महानगरपालिकेच्या उद्यान विभागांतर्गत उद्यान विषयक विविध कामाचे अनुषंगाने '' उद्यान पर्यवेक्षक '' हे पद निव्वळ कंत्राटी तत्वावर प्रथमतः 6 महिन्याचे कालावधी करिता, एकमुस्त मानधन रू. 20,000/– (वीस हजार) प्रती महिना वर भरावयाचे आहे. पात्रतेचे निकष पूर्ण करणा–या इच्छुक उमेदवारांनी थेट मुलाखतीकरिता आवश्यक कागदपत्रांसह दि. 29/12/2021 रोजी सकाळी 10 : 30 ते दुपारी 12 : 30 वाजेपर्यंत अति. आयुक्त (सामान्य), छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय भवन, सिव्हील लाईन्स, नागपूर यांचे कार्यालय येथे व्यक्तिशः अर्ज सादर करावेत. पात्रतेचे निकष पूर्ण करणा–या उमेदवारांची थेट मुलाखत दिनांक 29.12.2021 रोजी सायंकाळी 04.00 वाजता घेण्यांत येईल.

| अ. क्र. | पदाचे नांव | एकुण पद व संवर्ग | वयोमर्यादा | शैक्षणिक पात्रता व अनुभव. |
|---|---|---|---|---|
| 1 | उद्यान पर्यवेक्षक (कंत्राटी) | 01 (खुला) | 38 वर्षे पेक्षा जास्त नसावी | मान्यताप्राप्त कृषी विद्यापिठाची बी.एस.सी. (B.Sc.) (हॉर्टिकल्चर्स) ॲग्रीकल्चर / बॉटनी / फॉरेस्ट्री पदवी /मान्यताप्राप्त विद्यापीठाची वनस्पती शास्त्रातील पदवी परीक्षा उत्तीर्ण<br>उद्यान विकास, देखभाल, वृक्ष संरक्षण व संवर्धन, रोपवाटीका व्यवस्थापन क्षेत्रातील कामाचा अनुभव असल्यास प्रधान्य . |

अटी व शर्ती :–

1) अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

2) अर्जदाराचे चारित्र्य चांगले असावे व कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभुमी असु नये.

3) सदर पदांची नेमणूक ही पूर्णतः कंत्राटी पध्दतीने असेल.

4) हे पद निव्वळ कंत्राटी पध्दतीने नेमणुकीचे असल्याने या पदावरील अधिकारी/कर्मचारी यांना शासकीय/निमशासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.

5) इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज महापालिका आयुक्त, नागपूर महानगरपालिका, सिव्हिल लाईन्स, नागपूर यांचेकडे नागपूर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर दिलेल्या प्रपत्रात अश्या (अर्जाचा नमूना) भरून थेट कार्यालयात सादर करावेत. इतर प्रपत्रात सादर केलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

6) शासन निर्णय दि. 09 फेब्रुवारी 2018 मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने करार/कंत्राटी पध्दती निर्माण केलेल्या पदांवर नेमणूकीच्या अटी शर्तीबाबत तसेच सदर नियुक्त कर्मचा–यांच्या सेवा नियमित न करण्याबाबत नमूद असल्याने उक्त पदावरील नियुक्ती ही निव्वळ कंत्राटी स्वरूपाची असून पुढे नियमित/स्थायी करण्यात येणार नाही व त्याबाबतचा कोणताही दावा न्यायालयात करता येणार नाही.

7) वयोमर्यादा विचारात घेतांना दि. 29/12/2021 ही तारीख ग्राहय धरण्यात येईल.

8) उमेदवारांनी त्यांच्या वय, शैक्षणिक पात्रता व अनुभवाच्या सर्व कागदपत्रांच्या छायाप्रती सांक्षाकिंत करून जोडाव्यात.

9) उमेदवारांनी अर्ज सादर करून अर्जासोबत एक फोटो चिकटवावा व एक फोटो संलग्न करावा.

10) नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विविक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल. तसेच सदर बंधपत्रात/हमीपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देतांना शासनाने विहीत केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरीक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे बंधपत्र /हमीपत्र उमेद्वाराला दयावे लागेल.

11) करार पध्दतीवरील उमेदवारांना नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करता येणार नाही,

12) उमेदवारांनी निवड प्रक्रिये दरम्यान नागपूर महानगरपालिकेच्या संकेतस्थळ www.nmcnagpur.gov.in वरील सुचनांची नोंद घ्यावी. तसेच इतर कोणत्याही मार्गाने सूचना देण्यात येणार नाही. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

13) . मुलाखतीअंती प्राप्त गुणानुसार गुणवत्ता यादी व प्रतिक्षा यादी म.न. पा. चे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येवुन त्यानुसार आदेश निर्गमीत करण्यात येईल.

14) दिनांक 29/12/2021 ला दुपारी 12.30 नंतर येणा–या उमेदवारांचा अर्ज स्विकारण्यांत येणार नाही.

15) कंत्राटी पध्दतीने नियुक्तीचे हे एकच पद 'खुल्या' संवर्गातील असल्याने मागासप्रवर्गातील उमेदवारांना वयाबाबत शिथीलता अनुज्ञेय राहणार नाही.

उपरोक्त पदाकरिता अर्ज विहीत नमुन्यातच सादर करावयाचा असून अर्जाचा नमूना व उक्त पदाकरिता आवश्यक अर्हता /अटी/ शर्ती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर www.nmcnagpur.gov.in वर उपलब्ध आहे.

हस्ता/– राधाकृष्णन बी.
आयुक्त
महानगरपालिका, नागपूर

दि. 22/12/2021

# अर्जाचा नमूना

फोटो

1. पदाचे नाव :– ..............................................................
2. अर्जदाराचे नांव :– ..............................................................
3. पूर्ण पत्ता :– ..................................................................
..................................................................
..................................................................
भ्रमणध्वनी क्रमांक :– ..............................................................
ई–मेल आय डी :– ..............................................................
4. जन्म दिनांक :– ..............................................................
5. दि. 29/12/2021 ला वय :– ..............................................................
(वय 38 वर्षापेक्षा जास्त नसावे)
6. उमेदवार पदास आवश्यक शैक्षणीक अहर्ता :– ..............................................................
पुर्ण करतात काय ? अर्हता नमुद करावी.
7. शैक्षणिक अर्हता :– ..............................................................

| उत्तीर्ण परीक्षा | विद्यापीठ | श्रेणी | टक्केवारी | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | विषय |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

8. अनुभव :– ....................................................................

| अ. क्र. | संस्थेचे नाव | धारण केलेले पद | कर्तव्य व जबाबदारी | कालावधी | उल्लेखनीय कामगीरी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

प्रमाणीत करण्यात येते की, वरील सर्व नमुद बाबी मी, स्वतः तपासून नमुद केल्या आहेत.

स्वाक्षरी

संलग्न :– प्रमाणपत्राचे नांव

1. किमान शैक्षणीक पात्रतेचे प्रमाणपत्र :– ..................................................................
2. वयासंबंधीचे प्रमाणपत्र :– ..................................................................
3. अनुभवासंबंधीचे प्रमाणपत्र :– ..................................................................